


# दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ८९ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शनिवार । ११/०४/२०२६ । पाने - ६




## मराठवाडा भूकंपाच्या धक्क्याने हादरला


हिंगोली (वृत्तसंस्था)

मराठवाडा परिसरात पुन्हा एकदा भूकंपाचे धक्के जाणवले असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शनिवारी सकाळी ८ वाजून ४७ मिनिटांनी हिंगोली जिल्ह्यात भूकंप झाला. या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ४.७ इतकी नोंदवली गेली आहे.

अचानक बसलेल्या या धक्क्यामुळे नागरिक काही काळ घराबाहेर पडल्याचे चित्र पाहायला मिळाले. भूकंप हिंगोली जिल्ह्यातील औंढानागनाथ परिसरात झाल्याची माहिती सर्वप्रथम समोर आली. मात्र, वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे गावाजवळ भूकंपाचे मुख्य केंद्र असल्याचे प्राथमिक निष्कर्षातून स्पष्ट झाले आहे. या भागात काही सेकंद जमीन हलल्याची जाणीव नागरिकांना झाली.

भूकंपाची नोंद लातूर येथील भूकंप मापन केंद्रावर करण्यात आली आहे. मराठवाड्यातील भूकंपीय हालचालींवर लक्ष ठेवणाऱ्या यंत्रणांनी तात्काळ या घटनेची माहिती संकलित केली. अधिकृत आकडेवारीनुसार, भूकंपाची तीव्रता मध्यम स्वरूपाची असली तरी काही ठिकाणी कंप स्पष्टपणे जाणवले.

हिंगोलीसह नांदेड आणि परभणी जिल्ह्यांमध्येही या भूकंपाचे धक्के जाणवले.



अनेक नागरिकांनी घरातील वस्तू हलल्याचे सांगितले. काही ठिकाणी लोक घाबरून घराबाहेर धावले, मात्र सुदैवाने आतापर्यंत कोणतीही मोठी जीवित किंवा वित्तहानी झाल्याची माहिती नाही.

प्रशासनाने नागरिकांना घाबरू नये, शांत राहावे आणि कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास त्वरित प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे. स्थानिक प्रशासन आणि आपत्कालीन यंत्रणा सतर्क ठेवण्यात आल्या असून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. दरम्यान, मराठवाडा हा भूकंपप्रवण पट्टा मानला जात असल्याने अशा घटनांची पुनरावृत्ती होत असते. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहून सुरक्षिततेच्या उपाययोजना पाळाव्यात, असे आवाहन तज्ज्ञांकडून करण्यात आले आहे.

१९९३ सालचा किल्लारी भूकंप हा महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात भीषण नैसर्गिक आपत्तींमध्ये गणला जातो. ३० सप्टेंबर १९९३ रोजी पहाटे साधारण ३ वाजून ५६ मिनिटांनी हा भूकंप झाला. याची तीव्रता रिश्टर स्केलवर सुमारे ६.३ इतकी नोंदवली गेली होती. या भूकंपाचा केंद्रबिंदू लातूर जिल्ह्यातील किल्लारी गावाजवळ होता, तर उस्मानाबाद जिल्ह्यातील अनेक भागांनाही याचा मोठा फटका बसला. या भूकंपात हजारो लोकांचा जीव गेला आणि अनेक गावे पूर्णपणे उध्वस्त झाली. अधिकृत आकडेवारीनुसार सुमारे १० हजारांहून अधिक लोकांचा मृत्यू झाला, तर हजारो जखमी झाले. किल्लारी, उस्मानाबाद, लातूर परिसरातील घरांची मोठ्या प्रमाणात पडझड झाली. अनेक कच्ची घरे आणि दगडी बांधकामे क्षणार्धात कोसळली, त्यामुळे लोकांना पळून जाण्याची संधीही मिळाली नाही. हा भूकंप रात्रीच्या वेळी झाल्याने लोक गाढ झोपेत होते, त्यामुळे नुकसान अधिक झाले. अनेक कुटुंबे पूर्णपणे उध्वस्त झाली. गावागावात भीषण हाहाकार माजला होता. रस्ते, पाणीपुरवठा, वीज व्यवस्था यांचे मोठे नुकसान झाले. बचाव आणि मदतकार्य सुरू करण्यात सुरुवातीला अडचणी आल्या, मात्र नंतर शासन, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर मदतकार्य राबवले.

## सरकारचा दावा, गॅस पुरवठा सुरळीत

मुंबई (वृत्तसंस्था)

इराणमधील युद्धविरामानंत्र देशात एलपीजी, पीएनजी तसेच पेट्रोल-डिझेलच्या पुरवठ्याबाबत निर्माण झालेल्या चिंतेवर केंद्र सरकारनं मोठा खुलासा करत दिलासा दिला आहे. सरकारकडे इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असून कोणत्याही प्रकारची टंचाई नसल्याचं स्पष्ट करण्यात आले आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, देशात दररोज सुमारे १ लाख एलपीजी सिलेंडरची विक्री होत असून पुरवठा पूर्णपणे सुरळीत आहे.



अमेरिका -इराण युद्धानंतर गॅस, पेट्रोल डिझेलची मोठी टंचाई निर्माण झाली होती. इराणने हार्मुजखाडी बंद केल्याने तेल, गॅस, पुरवठ्यावर ताण पडला होता. त्यामुळे देशभर गॅसच्या रांगा लागल्या होत्या. व्यवसायीक सिलेंडर देखील बंद करावे लागले होते. आता मात्र युद्ध विराम झाल्याने अंतरराष्ट्रीय तणाव निवळला आहे. व तेल पुरवठा देखील सुरळीत सुरू झाला आहे. त्यामुळे इंधन टंचाई कमी झाली असून देशभरातील विस्कळीत झालेला पुरवठा आता पुर्वपदावर येत आहे.

मंत्रालयाने स्पष्ट केले की, एलपीजी वितरक आणि पेट्रोल पंपांकडे पुरेसा साठा उपलब्ध आहे. घरगुती एलपीजी पुरवठा सामान्य असून ९८ टक्के बुकिंग ऑनलाइन पद्धतीने होत आहेत. व्यावसायिक एलपीजी पुरवठा देखील हळूहळू पूर्वपदावर येत आहे. सध्या सुमारे ७० टक्के पुरवठा पुन्हा सुरू झाला आहे. १४ मार्चपासून आतापर्यंत सुमारे १ लाख ६ हजार टन एलपीजीची विक्री झाली असून दररोज ६ ते ६.५ हजार टन विक्री होत असल्याची माहिती देण्यात आली.५ किलोच्या एलपीजी सिलेंडरबाबतही सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. नागरिकांना सुलभता मिळावी म्हणून ओळखपत्राशिवायही या सिलेंडरचा पुरवठा दुप्पट करण्यात आला आहे. दररोज सुमारे १ लाख ५ किलो सिलेंडर विकले जात असून २३ मार्चपासून आतापर्यंत ११ लाख सिलेंडरची विक्री झाली आहे.

सरकारकडून एलपीजीऐवजी पीएनजी वापर वाढवण्यावरही भर दिला जात आहे. यासाठी देशभरात २४०० हून अधिक जनजागृती शिबिरे आयोजित करात आली आहेत. नैसर्गिक वायू पुरवठ्यातही सुध्रणा होत असून उद्योग क्षेत्राला सुमारे ८० टक्के आणि खत उद्योगाला ९५ टक्के पुरवठा पुन्हा सुरू झाल्याचे मंत्रालयाने सांगितले.

## लोकपंचायत संस्थेसाठी अभिमानाचा क्षण

## सोलर स्प्रेयर प्रकल्पाला राज्यस्तरीय गौरव



मुंबई (प्रतिनिधी) : व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय मुंबई येथे दि. १० एप्रिल २०२६ रोजी आयोजित पारितोषिक वितरण सोहळ्यात लोकपंचायत संस्थेने उल्लेखनीय यश संपादन करत आपला ठसा उमटवला.

या सोहळ्यास कौशल्य विकास, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा, एआयएस अधिकारी मनीषा वर्मा, डीव्हीईटी संचालक सूर्यवंशी, आयुक्त अमित सैनी, कुलगुरू अपूर्वा पालकर तसेच DIPEX आयोजक कनक कवडीवाले आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात DIPEX राज्यस्तरीय स्पर्धेतील विजेते, Best ITI Award, कौशल्याचार्य पुरस्कार तसेच National Skill Competition मधील विजेत्यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी लोकपंचायत संस्थेच्या Solar Operated Sprayer Machine या अभिनव प्रकल्पाला मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले. या प्रकल्पाने यापूर्वी DIPEX २०२६ राज्यस्तरावर प्रथम क्रमांक पटकावला असून, पुन्हा एकदा मान्यवरांकडून मिळालेल्या कौतुकामुळे संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

DVET संचालकांनी आपल्या भाषणात DIPEX स्पर्धेत आयटीआय संस्थांना मिळणारे यश हे विभागासाठी अभिमानाची बाब असल्याचे सांगितले. त्यामुळेच संबंधित संस्थांचा विशेष सत्कार करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमानंतर DIPEX मध्ये प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या संस्थांच्या टीमसोबत स्वतंत्र संवाद सत्राचेही आयोजन करण्यात आले.

## डॉक्टरांविरोधातील एकतर्फी प्रचार थांबवा

## अधिकृत अहवालाची प्रतिक्षा करा – आयएमएची भूमिका

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर येथील इंडियन मेडिकल असोसिएशनने अलीकडे सोशल मीडिया व काही माध्यमांतून प्रसारित होत असलेल्या माहितीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. विशेषतः डॉ. अभिजीत कोरडे यांच्याबाबत एकतर्फी, अपूर्ण व पडताळणीविना माहिती पसरवली जात असल्याने डॉक्टरांच्या व्यावसायिक प्रतिमेला धक्का बसत असून वैद्यकीय क्षेत्रात अविश्वासाचे वातावरण निर्माण होत असल्याचे आयएमएने स्पष्ट केले आहे.

उपलब्ध माहितीनुसार, फेब्रुवारी २०२५ मध्ये हृदयविकाराच्या झटक्यानंतर दत्तात्रय दळवी यांना सोनांबेकर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. २८ फेब्रुवारी रोजी डॉ. कोरडे यांनी त्यांच्यावर अँजिओग्राफी व अँजिओप्लास्टी केली होती. ही प्रक्रिया नियमानुसार व कोणतीही घाईगडबड न करता पार पडल्याचा दावा आयएमएने केला आहे. नातेवाईकांकडून करण्यात आलेले आरोप रात्री घाईत उपचार झाले किंवा गँगरीन झाला हे आरोप उपलब्ध माहितीनुसार चुकीचे असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

सदर उपचार महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत विनामूल्य करण्यात आले होते. पुढील उपचारादरम्यान रुग्णाला **Acute Kidney Injury (AKI)** ही गंभीर गुंतागुंत निर्माण झाली. त्यानंतर आवश्यक प्राथमिक उपचार करून, पूर्णवेळ नेफ्रोलॉजिस्ट उपलब्ध असलेल्या उच्चस्तरीय रुग्णालयात रुग्णाला रेफर करण्यात आले. दुर्दैवाने, रेफरलनंतर सुमारे तीन आठवड्यांनी डायलिसिसदरम्यान रुग्णाचा मृत्यू झाला.



डॉक्टर्स व वैद्यकीय क्षेत्राची बदनामी केली जाते. ही बदनामी थांबवावी व डॉक्टरांवर होणारे चुकीचे आरोप थांबवावे या मागणीचे निवेदन आयएमए संघटनेच्यावतीने प्रांताधिकाऱ्यांना देण्यात आले यावेळी संघटनेचे डॉक्टर्स मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आयएमएच्या मते, या प्रकरणात निष्काळजीपणा किंवा वैद्यकीय त्रुटी झाली आहे का, याचा अंतिम निष्कर्ष अद्याप लागलेला नसून, अहिल्यानगर सिव्हिल सर्जन यांचा अधिकृत अहवाल येणे बाकी आहे. तसेच न्यायालयाने केवळ एफआयआर नोंदवून चौकशी करण्याचे आदेश दिले असून डॉक्टर दोषी असल्याचे कोणतेही निष्कर्ष अद्याप नोंदवलेले नाहीत.

याशिवाय, या प्रकरणाशी थेट संबंध नसताना डॉ. अजिंक्य सोनांबेकर यांनाही सोशल मीडियावर लक्ष्य केले जात असल्याची बाब आयएमएने निषेधार्ह ठरवली आहे.आयएमएने प्रशासन व न्यायप्रक्रियेवर पूर्ण विश्वास व्यक्त करत, निष्पक्ष व तथ्याधारित चौकशी व्हावी, अशी भूमिका घेतली आहे. मात्र, अधिकृत अहवाल येण्यापूर्वीच सोशल मीडियावर चालणारी मीडिया ट्रायल थांबवावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

आयएमएची नागरिकांना विनंती आहे की, अफवा, अपूर्ण माहिती व भावनिक एकतर्फी मांडणी टाळावी. सत्य परिस्थिती समोर येईपर्यंत संयम बाळगावा आणि कोणालाही आधीच दोषी ठरवू नये. घडलेल्या या प्रकरणामुळे वैद्यकीय क्षेत्रात चर्चा रंगली असून, आता सर्वांचे लक्ष अधिकृत चौकशी अहवालाकडे लागले आहे.









# वारकरी संप्रदाय हा सर्व समाजाला घेऊन चालणारा - माजी मंत्री थोरात



संगमनेर (प्रतिनिधी)

शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या वारकरी संप्रदायात सर्व समाज एकत्र येऊन अखंड हरिनाम सप्ताह करतात. सर्व समाजाला एकत्र आणण्याचे वैशिष्ट्य वारकरी संप्रदायाचे आहे. वारकरी संप्रदायाला मोठी संतपरंपरा आहे. संत ज्ञानेश्वरांचे पसायदान हे काव्य मानवतेच्या कल्याणासाठी असून सर्व समाजाला एकत्रित पुढे घेऊन जाणारा वारकरी संप्रदाय असल्याचे प्रतिपादन काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा मा. महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

संगमनेर खुर्द येथे अखंड हरिनाम सप्ताह निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी हरिभक्त परायण कविराज महाराज झावरे यांचे किर्तन झाले. याप्रसंगी आर. एम. कातोरे, एस. पी. गोडसे, गणेश शिंदे, रमेश सुपेकर, भगवान गोफणे, दीपक भोर, दत्तात्रय खुळे, रोहिणी गुंजाळ, वैशाली सुपेकर, श्वेता मंडलिक, शैला भारती, सुभाष पाटील गुंजाळ, यासहतरुण वर्ग व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की वारकरी संप्रदायामध्ये विविध जाती धर्म समाजातील अनेक संतांनी समतेचा विचार दिला. हा मानवतेचा विचार आहे. ज्ञानेश्वरी सारखे महाकाव्य लिहिणारे संत ज्ञानेश्वर व त्यांच्या भावंडांना त्या काळात मोठा त्रास झाला. आई-वडिलांना आत्महत्या करावी लागली. त्यांनी लिहिलेले ज्ञानेश्वरी हे महाकाव्य व पसायदान हे संपूर्ण मानवतेच्या कल्याणासाठी आहे सध्याच्या युद्धाच्या वातावरणामध्ये जगाला कोणते काव्य महत्वाचे तर पसायदान. सर्वांच्या जीवनामध्ये सुख आनंद मिळावा दृष्ट प्रवृत्ती नष्ट व्हावी हा विचार संत ज्ञानेश्वर यांनी दिला. या संत मांदियाळीत संत तुकाराम, संत चोखोबा, संत गोरा कुंभार, संत नामदेव, एकनाथ, नरहरी सोनार असे अठरापगड समाजातील संत होऊन गेले.

संत चोखामळा हे मागासवर्गीय समाजातील होते. पण अभीर गुलाल उधळीत रंग हा त्यांचा अभंग अत्यंत सुंदर आहे. त्यांच्या पत्नी सोयराबाई यांनी लिहिलेला अवघा रंग एक झाला हा अभंग, अशी कितीतरी काव्य मानवतेचे वर्णन करणारे आहेत. वारकरी संप्रदाय हा मानवतेचा धर्म सांगणार असून सगळे समाज व जाती धर्म यांना बरोबर घेऊन जाणार आहे. यामध्ये कधीही भेदभाव नाही .अंगारे, धुपारे, गंडे , तोडे, आणि बुवाबाजीला थारा नाही. म्हणून हा विचार आपल्याला जपायचं असून सर्वांना पुढे न्यायचा असल्याचे लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी म्हटले आहे. तर ह. भ. प. कविराज महाराज झावरे म्हणाले की वारकरी संप्रदायाचा विचार पुढे नेणारे लोकनेते बाळासाहेब थोरात हे आहेत. सर्वांना सामावून घेत त्यांनी संगमनेर तालुका हा राज्यामध्ये अव्वल बनवला आहे. प्रत्येकाने आपल्या क्षेत्रामध्ये अत्यंत प्रामाणिकपणे काम करून ईश्वराची सेवा करावी असे आवाहन त्यांनी केले.

# धांदरफळ वीज उपकेंद्राची क्षमता दुप्पट

## आ. खताळ यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिलासा



युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर - संगमनेर तालुक्यातील धांदरफळ वीज उपकेंद्रावरील ट्रान्सफॉर्मरची क्षमता आ. अमोल खताळ यांच्या विशेष पाठपुराव्यातून ५ एमव्हीए क्षमतेचा पॉवर ट्रान्सफॉर्मर आता १० एमव्हीए केला आहे. या ट्रांसफार्मरचे काम पूर्णत्वास आले असून लवकरच त्याचे लोकार्पण करण्यात येणार आहे.

धांदरफळ वीज उपकेंद्रांवर गेल्या काही महिन्यांपासून अतिरिक्त भार येत होता. त्यामुळे शेतकऱ्यांना कमी दाबाने तसेच अपुऱ्या प्रमाणामध्ये वीजपुरवठा होत होता. परिणामी शेतीपंप सुरळीतपणे चालवणे कठीण झाले होते आणि पिकांच्या सिंचनावर त्याचा विपरीत परिणाम होत होता. ही गंभीर समस्या परिसरातील सर्वच शेतकऱ्यांनी आमदार खताळ यांच्या निदर्शनास आणून दिली.

याबाबत आमदार.अमोल खाताळ यांनी महावितरण कंपनी प्रशासना कडे सातत्याने पाठपुरावा करत अनेक दिवसापासून प्रलंबित पडलेला प्रश्न मार्गी लावला .त्यांच्या प्रयत्नां मुळे धांदरफळ उपकेंद्रातील ट्रान्स फॉर्मरची क्षमता दुप्पट करण्यात आली आहे.या निर्णयामुळे धांदरफळ व परिसरातील गावांमध्ये अधिक स्थिर व पुरेसा वीज पुरवठा मिळणार असून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे या कामामुळे परिसरा तील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करत आमदार अमोल खताळ यांचे आभार मानले आहे.




# सिन्नरमध्ये भीषण अपघातात चार जणांचा होरपळून मृत्यू




युवावार्ता (प्रतिनिधी)

सिन्नर - तालुक्याच्या पूर्व भागातील पंचाळे-शहा रस्त्यावर रात्री दोन वाजेच्या सुमारास ट्रक व पिकअप यांच्यात जोरदार धडक होऊन पिकप कार पेटली. यात दोन महिला व दोन पुरुष यांचा होरपळून मृत्यू झाला. पंचाळे येथून काहीजण पिकअप गाडीने जागरण गोंधळासाठी गेल्याची समजते रात्री परत येत असताना पंचाळे- शहा रस्त्यावर पंचाळे गावापासून दोन किलोमीटर अंतरावर हा भीषण अपघात झाला. यात पंचाळे गावातील आदिवासी कुटुंबातील चौघांचा होरपळून मृत्यू झाला. पशुखाद्य भरलेल्या असलेल्या ट्रकने सुमारे १०० फूट पिकअप ओढत नेली. यात डांबरी रस्त्यावर घर्षण होऊन पिकअप पेटली असावी असा अंदाज आहे. पंचाळे व शिंदेवाडी ग्रामस्थांनी रात्री उशिरा मदत कार्य केले. चारही मृत व्यक्ती सिन्नर तालुक्यातील पंचाळे येथील रहिवासी आहे. घटनास्थळी आग विझवण्यासाठी अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले होते.

# धामणगाव पाट परिसरात अवैध दारू पकडली

## ४ लाख ६४ हजार ५४० रुपयांचा मुद्देमाल जप्त

युवावार्ता (प्रतिनिधी) अकोले-

तालुक्यातील धामणगाव पाट परिसरात अवैधरित्या दारुची वाहतूक करणारे वाहन श्रीरामपूर अपर पोलीस अधी-क्षक कार्यालयाचे पथक आणि अकोले पोलिसांनी शुक्रवारी (दि.१०) सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास पकडले. या कारवाईत दारु, मोबाईल आणि वाहन असा एकूण ४ लाख ६४ हजार ५४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे..

अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी कार्यालयातील पोहेकॉ. दादासाहेब लोढे, संदीप दरंदले, पोकॉ. अशोक गाढे, राजेंद्र बिरदवडे यांना अकोले पो-लीस ठाणे हद्दीत अवैध धंद्यांवर कारवाई करण्याबाबत आदेशित केले होते. त्यावरुन हे पथक पेट्रोलिंग करत असताना पोहेकॉ. लोंढे यांना गोपनीय बातमी मिळाली, की अकोले ते धामणगाव पाट रस्त्याने एक छोटा हत्ती वाहनातून (क्र. एमएच. १७, सीव्ही. ४१६२) दारुची वाहतूक होणार आहे. पथकाने तत्काळ कोतूळ दूरक्षेत्र येथे जावून तेथील पोहेकॉ. अनिल जाधव व पोकॉ. महेंद्र गुंजाळ, दोन पंच यांच्यासह बातमीतील हकीगत धामणगाव पाट शिवारात थांबले. त्यानंतर सकाळी ८.३० वाजेच्या सुमारास एक पांढऱ्या रंगाचा छोटा हत्ती वाहन अकोलेकडून धामणगाव पाटकडे येत असताना त्यात विशाल पोपट निळे (वय २६, रा. कौठे धांदरपफळ) व राजेंद्र बाळासाहेब तांबे (वय ३०, रा. पेमगिरी) हे दोघे मिळून आले. त्यांच्याकडे देशी दारु वाहतुकीचा परवाना आहे का? असे विचारले असता त्यांनी नकार दिला. त्यांवर



हा माल कोणाचा व कोठे घेवून जात असल्याबाबत विचारपूस केली असता अक्षय मारुती वाकचौरे (रा. परखतपूर, ता. अकोले) याच्या सांगण्यावरुन उमेश सूर्यवंशी (रा. संगमनेर) याच्याकडून खरेदी करत कोतूळ येथे विक्रीसाठी जात असल्याचे सांगितले. त्यांच्याकडून २ लाख ५९ हजार ४० रुपये किमतीच्या ८०० बाटल्या, वाहन व दोन मोबाइल असा एकूण ४ लाख ६४ हजार ५४० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या चौघांवर अकोले पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास अकोले पोलीस करत आहे:

# बहुआयामी व्यक्तिमत्व मुख्याध्यापक मधुकर गुंजाळ सर सेवानिवृत्त

गरीबीतले दिवस माणसाला खुप काही शिकवून जातात आणि अशीच परिस्थिती गुंजाळ परीवाराची. त्या काळात प्रत्येक गोष्ट मोठी वाटायची आणि प्रत्येक स्वप्नासाठी झगडावे लागायचे. पोट भरायला कष्ट, शिक्षणासाठी संघर्ष, आणि परिस्थितीशी रोजची झुंज. हे सर्व आमच्या आयुष्याचा भाग होतां. अशाच परिस्थितीत १९७५ पासून आई- वडील दोघांनी बिडी व्यवसाय करून आम्ही चार भावडांचे शिक्षण चालू ठेवले. आणि बारावीत असतांना वडीलांचे छत्र हरपलं. थोरला असल्या कारणाने घराची जबाबदारी अचानक खांद्यावर आली. गरिबी तर होतीच. पण वडीलांच्या निधनानंतर प्रत्येक दिवस एक लढाई बनला. शिक्षण चालु ठेवण्यासाठी छोट्या-मोठ्या कामाचा आधार घ्यावा लागला. आयुष्य अंधारमय वाटु लागले होते. परंतु अशा कठीण काळात आईचे भाऊ, सरांचे मामा त्यांच्यासाठी खंबरी आधार बनले. कै. यादव मामा, चंद्रभान मामा व कै. सुर्यभान लांडगे मामा यांनी केवळ अर्थिक मदतच केली नाही तर मानसिक धीरही दिला. वडीलांची उणिव कुणीच भरून काढु शकत नाही, पण मामांनी आपल्या प्रेमाणे आणि साथीने कधीही एकटे पडू दिले नाही. मातोश्रीला वाटायचे की आम्ही जे सोसले ते मुलांच्या वाट्याला येवू नये, तीची तळमळ स्वस्थ बसु देत नव्हती. आपल्या मुलांनी शिक्षण घ्यावं. खूप मोठं व्हावे. यासाठी रात्रंदिवस बिडी बांधायचे काम केले. शिक्षण पुर्ण करत राहिली आणि त्यातूनच ही मुले घडत राहीली. आणि १९८९ साली गणित हा विषय घेवून बीएससी हे शिक्षण पुर्ण केले व गुरूवर्य स्व. तात्यासाहे कानवडे साहेबांनी न्यु इंग्लीश स्कुल वडगांव लांडगा या विद्यालयात पार्ट टाईम शिक्षक म्हणून नोकरी दिली. अध्यापनाचे कार्य करत असतानाच बी.एड.चे शिक्षण पुर्ण केले व १९९२ पासून न्यू इंग्लिश स्कुल हिवरगाव आंबरे या विद्यालयात गेली ३४ वर्ष अध्यापणाचे पवित्र काम करत आहेत.

लहान बंधु स्व. बाबासाहेब डी.एड्. होवून संगमनेर येथील गणेश सराफ विद्यालय, प्राथमिक विभागात शिक्षक म्हणून नोकरी मिळाली. त्यानंतर कुटूंबाला आर्थिक आधार प्राप्त झाल्यामुळे लहान बहिण मिनाचे डी.एड् शिक्षण पुर्ण करून ती जिल्हा परिषद प्रा. शाळेत नोकरी करत आहे. आणि मोठी बहिण सुशिला ही वडगांव लांडगा या गावातील खानेकर कुटूंबात उत्तम कुटूंब सांभाळत आहे. अशा प्रकारे सर्व भावंडांचे सरकारी नोकरीत काम झाले. आणि कुठेतरी आईच्या संघर्षाची चीज खऱ्या अर्थाने सुरू झाले.

असेच सर्वांच्या सहकार्याने कुटूंबाची प्रगती होत होती. आणि अशाच परिस्थितीत मधुकर सरांचे लग्न डोंगरगांव येथील हासे कुटूंबातील



संगिता मॅडम बरोबर १९९६ साली झाले. आज संगिता उर्फ हासे मॅडम या डोंगरगाव येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मा. वि. डोंगरगांव येथे मुख्याध्यापिका पदावर कार्यरत आहेत. संगिता मॅडम या पण गरीब कुटूंबातील असल्यामुळे त्यांना गरिबीची जाण होती. त्यांच्याकडे जिद्द, चिकाटी अन् आत्मविश्वास ठासून भरला असल्यामुळे प्रपंच्याचा गाडा ओढण्यास सुरूवात केली. नंदेचे लग्न, दिराचे लग्न हे सर्व करत असतांना अन् विनाअनुदानित काळात नोकरी करत होत्या. त्यातच त्यांनी अपुर्ण रहिलेले एम्.ए.चे शिक्षण पुर्ण केले. दोन मुले झाली. त्यांना सांभाळत, नोकरी व कुटूंब सांभाळले. त्यांना उत्तम संस्कार दिले. आपल्याला आलेल्या अडचणी त्यांना येवू नये त्यासाठी मुलांच्या शिक्षणासाठी आतोनात प्रयत्न केले. मोठा मुलगा शुभम हा मॅकेनिकलमध्ये डिग्री घेवून एमबीए पुर्ण करून सध्या तो आयटी कंपनीमध्ये पुण्याला जॉब करत आहे. तसेच लहान मुलगी डॉ. अदिती गर्व्हमेंट मेडीकल कॉलेज अकोला (जिल्हा) येथे बीएएमएस ही मेडीकल पदवी घेवून सध्या ती इन्टरशिप करत आहे. अशा पद्धतीने केलेल्या चांगल्या कर्माची फळे मिळत आहे व मिळाली आहे. मुख्याध्यापक श्री. गुंजाळ सर एक अष्टपैलु व्यक्तिमत्व, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक कार्य यासह अनेक संस्कारक्षम व शिस्तप्रिय विद्यार्थी घडविणारे व्यक्तिमत्व होय.

सरांची त्यांच्या आई-वडीलांवर खूप मोठी श्रद्धा आहे. सरांचे अनेक क्षेत्रातील मित्र परीवार आणि सामाजिक संपर्क मोठ्या प्रमाणात आहे. ते सामाजिक कार्यात नेहमीच आग्रेसर असतात. तसेच राजकीय क्षेत्रातही त्यांना आवड आहे. ते वडगांव लांडगा येथील हुनमान नागरी पतसंस्थेत संचालक म्हणून काम पहातात. त्यांनी कधीही शैक्षणिक कामावर इतर घटकांचा परिणाम होवू दिला नाही. विद्यालयात काम करत असतांना कधीही राजकारणाचा शिरकाव होवू दिला नाही. असा त्यांचा स्वभाव राहिलेला आहे.

शैक्षणिक क्षेत्रात काम करत असतांना त्यांनी नेहमी विद्यार्थ्यांचे व शाळेचे हित जोपासले. सहशिक्षक पदावरून मुख्याध्यापक पदाची जबाबदारी उत्तमपणे चालवीत आहे. शाळेच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न केले. इ. १० वीचा सलग १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली.

विविध स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यालयाचे विद्यार्थी चमकले. तसेच राष्ट्रीय व राज्यपातळीवर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी बाजी मारली. विद्यालयाच्या भौतीक सुविधा पुर्ण करण्यासाठी माजी विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग मिळविला. आणि सर्व विद्यार्थ्यांच्या मनामध्ये सरांनी आदराचे स्थान निर्माण केले. तसेच गावातील सर्व ग्रामस्थांच्या मनामध्ये सुद्धा आदराचे स्थान निर्माण केले आहे. सरांचे अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रामध्ये स्वत;च्या पायावर उभे राहुन काम करत आहेत. सरांनी फक्त अध्यापन न करता विद्यार्थ्यांनी जीवन जगत असताना कसे वागावे, याचे पण धडे दिले. गावामध्ये सर्वांशी मिळून मिसळून वागण्याचा, रहाण्याचा नेहमीच त्यांनी प्रयत्न केला. शाळा आणि गाव व संस्था यांच्यामधील दुवा म्हणून त्यांनी काम केले. आणि म्हणून या गावात विद्यार्थ्यांनी आणि गावकऱ्यांनी एवढा मोठा सेवापूर्तीचा कार्यक्रम घडवून आणला आहे. त्यांचा खूप मोठा आनंद आम्हाल होत आहे. आणि याचाच सर्व परिपाक म्हणून काही संस्थांनी त्यांना त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेवून काही पुरस्कार पण दिले. त्यापैकी महाराष्ट्र शासन जनकल्याण सामाजिक सेवा संस्था कोल्हापूर या संस्थेच्या राज्यस्तरतीय गुणवंत मुख्याध्यापक पुरस्कार तसेच महाराष्ट्र राज्य संस्कार प्रतिष्ठान पिंपरी चिंचवड पुणे या संस्थेचा आदर्श मुख्याध्यापक पुरस्कारने सन्मानित करण्यात आले.

**ज्ञानाची ज्योत पेटवत राहीले आयुष्यभर**
**विद्यार्थ्यांच्या मनात रूजवले संस्कार अमर**
**३४ वर्षाचा प्रवास आज झाला पुर्ण,**
**तुमच्या कार्याला आमचा सलाम अपार**

माझ्या या सरांना पुढील आयुष्यासाठी निरोगी आयुष्यासाठी मनपूर्वक शुभेच्छा... सेवापूर्ती निमित्त हार्दिक अभिनंदन..

**शब्दांकन**
**अमोल अशोक ठुबे (माजी वद्यिार्थी)**
**उपसरपंच, हिवरगाव आंबरे**


सस्नेह निमंत्रण !

ज्ञानोदय शिक्षण प्रसारक मंडळ, ता. संगमनेर, निमगाव बु।। संचिलत

न्यु इंग्लिश स्कूल, हिवरगाव आंबरे, ता. अकोले, जि. अ.नगर

मुख्याध्यापक श्री. मधुकर कारभारी गुंजाळ

हे आपल्या प्रदिर्घ सेवेनंतर नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त होत आहे.

प्रमुख अतिथी

मा. आ. श्री. बाळासाहेब थोरात (मा. महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य)
मा. आ. डॉ. किरणजी लहामटे आमदार, अकोले विधानसभा
मा. आ. सत्यजितदादा तांबे सदस्य, विधानपरिषद महा. राज्य
मा. डॉ. जयश्रीताई थोरात अध्यक्ष, एकविरा फाऊंडेशन, संगमनेर

व्याख्याते - मा. प्राचार्य श्री. प्रदिपजी कदम सर (महाराष्ट्रातील प्रसिद्ध वक्ते)
संस्थापक अध्यक्ष, मानवता प्रतिष्ठाण महाराष्ट्र राज्य

त्यांचा ।। सेवापुर्ती गौरव सोहळा ।। तसेच



श्री. रेवगडे मधुकर विष्णू (मा. मुख्याध्यापक)
श्री. कानवडे रमेश रामकृष्ण (मा. मुख्याध्यापक)
श्री. भागवत पांडुरंग मारूती (मा. मुख्याध्यापक)
श्री. बोऱ्हाडे विलास बाळकृष्ण (मा. सहशिक्षक)
श्री. कानवडे भारत आत्माराम (सहशिक्षक)
श्री. येंधे दिलीप भावका (क. लिपीक)
श्री. वाकचौरे अशोक भगवंता (कर्मचारी)

या मान्यवरांचा गौरव सोहळा आयोजित केला आहे.

रविवार दि. १२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९.०० वा.

खालील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. तरी आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे

या मान्यवरांचा गौरव सोहळा आयोजित केला आहे.

अध्यक्ष - मा. श्री. रामकृष्ण नानाजी भांगरे
अध्यक्ष, ज्ञानोदय शिक्षण प्रसारक मंडळ ता. संगमनेर, निमगाव बु.।।

शुभहस्ते - मा. श्रीमती उज्वलाताई रामचंद्र कानवडे
सेक्रेटरी, ज्ञानोदय शिक्षण प्रसारक मंडळ संगमनेर सी/ओ निमगाव बु.।।

मा. श्री. रामकृष्ण रेवजी पवार (उपाध्यक्ष), मा.श्री. संतोष प्रताप नेहे (सहसचिव)
मा. श्री. प्रशांत बाळासाहेब कानवडे (खजिनदार), मा. श्री. प्रशांत भाऊसाहेब ठाणगे (सदस्य)
मा. श्रीमती निशा शिवाजी कानवडे (सदस्य), मा. श्री. धनंजय रामकृष्ण भांगरे (सदस्य)
ज्ञानोदय शिक्षण प्रसारक मंडळ ता. संगमनेर, निमगाव बु.।।

ठिकाण - न्यू इंग्लिश स्कूल, हिवरगाव आंबरे, ता. अकोले, जि. अहिल्यानगर

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग - प्रसुति
• मुळव्याध-भगंदर-फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# राहुरी विधानसभा पोटनिवडणूकीत उमेदवारांनी इलेक्ट्रॉनिक जाहिरातींचे प्रमाणीकरण करून घेणे आवश्यक - जिल्हाधिकारी

अहिल्यानगर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
राहुरी विधानसभा पोटनिवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली असून, या पार्श्वभूमीवर निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांनी आपल्या इलेक्ट्रॉनिक जाहिरातींच्या प्रसारणापूर्वी जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व नियंत्रण समितीकडून त्यांचे प्रमाणीकरण करून घेणे आवश्यक आहे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा समितीचे अध्यक्ष डॉ. पंकज आशिया यांनी केले आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या आदेश व सूचनांनुसार, सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या निवडणूक विषयक जाहिरातींचे पूर्वप्रमाणीकरण करणे बंधनकारक आहे. यामध्ये दूरदर्शन, उपग्रह वाहिन्या, केबल नेटवर्क, यूट्यूब वाहिन्या, आकाशवाणी, खासगी एफएम वाहिन्या, चित्रपटगृहे, मोठ्या प्रमाणात पाठविले जाणारे संदेश, ध्वनी संदेश तसेच विविध संकेतस्थळांचा समावेश होतो.

सोशल माध्यमांसाठीही हेच नियम लागू असून, फेसबुक, एक्स, इंस्टाग्राम, व्हॉट्सप, टेलिग्राम यांसारख्या माध्यमांद्वारे तसेच व्हिडिओ शेअरिंग प्लॅटफॉर्म आणि ब्लॉगिंग संकेतस्थळांवर केल्या जाणाऱ्या प्रचारासाठी आयोगाच्या नियमांचे पालन करणे उमेदवारांना बंधनकारक आहे.



जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व नियंत्रण समितीत जिल्हाधिकारी हे अध्यक्ष असून, संबंधित मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी, पोलीस निरीक्षक सायबर कक्ष, आकाशवाणीचे कार्यक्रम अधिकारी आणि अधिस्वीकृतीधारक ज्येष्ठ पत्रकार हे सदस्य आहेत. जिल्हा माहिती अधिकारी हे या समितीचे सदस्य सचिव आहेत.

निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने जाहिरात प्रसारित किंवा प्रसिद्ध करण्याच्या दिनांकापूर्वी किमान पाच दिवस आधी संबंधित समितीकडे प्रमाणीकरणासाठी अर्ज करणे आवश्यक आहे. हे अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयातील दुसऱ्या मजल्यावर स्थापन करण्यात आलेल्या माध्यम कक्षामध्ये स्वीकारले जातील. अर्जासोबत जाहिरातीची इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रत तसेच उमेदवाराने साक्षांकित केलेल्या जाहिरात संहितेच्या दोन मुद्रित प्रती जोडणे आवश्यक आहे, असेही जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी स्पष्ट केले आहे.

# आम्ही राजापूरकर...

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
आम्ही राजापूरकर या उपक्रमाचे २०२५ - २६ हे पाचवे वर्ष. स्व. प्रा. गणपतराव सोनवणे व डॉ. के. पी. बैरागी यांच्या संकल्पनेतून आणि दैनिक युवावार्ताचे संस्थापक किसन भाऊ हासे यांच्या प्रत्यक्ष कृतीतून या उपक्रमास मूर्त स्वरूप आले. या उपक्रमाचे मूळ उद्दिष्ट असे की, राजापूर भागातील जी मंडळी नोकरी, छोटे- मोठे उद्योग व व्यावसायिक निमित्ताने बाहेरगावी आहेत, अशा सर्व मंडळींनी वर्षातून एक दिवस तरी एकत्र येऊन प्रत्यक्षात एकमेकांशी संवाद साधावा. आपल्या कुटुंबाची, मुलांची एकमेकांना माहिती द्यावी. सामाजिक एकोपा वाढवून आपले संबंध अधिक दृढ व्हावेत. या माध्यमातून समाजात ज्या सामाजिक समस्या निर्माण होत आहेत, त्या दूर होण्यास तसेच नवीन नातेसंबंध दृढ होण्यास नक्कीच मदत होऊ शकेल.

आपण आज सोशल मीडियाद्वारे रोज एकमेकांशी संवाद साधत असू, तरी त्यात एक प्रकारचा कोरडेपणा जाणवतो आहे. म्हणून प्रत्यक्ष या उपक्रमाच्या माध्यमातून आपण एकत्र येऊन आपली मैत्री आणि स्नेह भाव वाढवला पाहिजे, तर ती एक चांगली सामाजिक आणि हितकारक बाब ठरेल, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

चला तर मित्रांनो, यासाठी आपण सर्व एकत्र येऊ या आणि भेट द्या, भेट घ्या या उपक्रमास माझ्याकडून खूप शुभेच्छा.

**घोलप पी. आर.**
**माजी प्राचार्य, मुंबई**

# एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये आता कॅन्सर तज्ज्ञ डॉ. संदीप इशी यांची सेवा

नाशिक
(युवावार्ता प्रतिनिधी)-
मुंबईतील प्रख्यात टाटा मेमोरियल हॉस्पिटलचा अनुभव असलेले आणि उत्तर महाराष्ट्रातील ज्येष्ठ आणि प्रख्यात मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट (कॅन्सर तज्ज्ञ) डॉ. संदीप इशी आता एसएमबीटी (एसएमबीटी) हॉस्पिटल व कॅन्सर इन्स्टिट्यूट येथे पूर्णवेळ सेवा देण्यासाठी रुजू झाले आहेत. त्यांच्या निवडीमुळे नाशिक, अहमदनगर, छ. संभाजीनगर, जालना, ठाणे, पालघरसह खान्देशातील रुग्णांना आता जागतिक दर्जाचे उपचार आपल्या जवळच उपलब्ध झाले आहेत. जास्तीत जास्त रुग्णांनी हॉस्पिटलच्या विशेष योजनांचा लाभ घेऊन तज्ञ डॉक्टरांकडून उपचार करून घ्यावेत, असे आवाहन हॉस्पिटल प्रशासनाकडून करण्यात आले आहे.





डॉ. संदीप इशी यांनी मुंबईच्या टि. एन. मेडिकल कॉलेजमधून वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर बेंगळुरू येथून डी.एन.बी. आणि त्यानंतर टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई येथून 'मेडिकल ऑन्कोलॉजी'मध्ये डी.एम. ही सर्वोच्च पदवी संपादन केली आहे. कॅन्सर उपचाराचा त्यांना १४ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे. गेल्या ७ वर्षांपासून त्यांनी नाशिकमध्ये हजारो रुग्णांवर यशस्वी उपचार केले आहेत. टाटा मेमोरियल हॉस्पिटल आणि निमहन्स (निमहन्स) सारख्या प्रतिष्ठित संस्थांमध्ये त्यांनी वरिष्ठ निवासी म्हणून काम केले असल्याने जटिल प्रकरणांमध्ये त्यांनी विशेष नैपुण्य मिळवले आहे.

कर्करोगाच्या उपचारात केवळ शस्त्रक्रिया महत्त्वाची नसते, तर त्यानंतर दिली जाणारी औषधोपचार पद्धती रुग्णाचे आयुष्य वाढवण्यासाठी मोलाची ठरते. डॉ. इशी हे सिस्टेमिक केमोथेरपी, इम्युनोथेरपी, केमो-रेडिओथेरपी, मॉलिक्युलर टार्गेटेड थेरपी आणि हार्मोनल थेरपी यांसारख्या प्रगत उपचार पद्धतींमध्ये तज्ञ मानले जातात. विशेषतः रक्ताचा कॅन्सर (लिम्फोमा / ल्युकेमिया), स्तनाचा कॅन्सर आणि फुफ्फुसांच्या कर्करोगावर उपचार करण्यासाठी त्यांची ओळख आहे.

एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये डॉ. इशी यांची सेवा उपलब्ध झाल्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना मोठा फायदा होणार आहे. आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना योजनेअंतर्गत सर्व रेशनकार्ड धारकांसाठी येथे मोफत उपचार आणि शस्त्रक्रिया उपलब्ध आहेत. एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये डॉ. संदीप इशी यांची ओपीडी सेवा सोमवार ते शनिवार, सकाळी ९.०० ते दुपारी ४.३० या वेळेत उपलब्ध असेल. अधिक माहितीसाठी रुग्णांनी ०२५३-६९४०००० या क्रमांकावर संपर्क करावा किंवा रुग्णालयात १४ क्रमांकाच्या ओपीडीला भेट द्यावी, असे आवाहन हॉस्पिटल प्रशासनाने केले आहे.

आजार अंगावर काढू नका.

कर्करोगाचे लवकर निदान झाल्यास तो पूर्णपणे बरा होऊ शकतो. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर आम्ही ग्रामीण भागातील शेवटच्या रुग्णापर्यंत पोहोचण्याचे ध्येय ठेवले आहे. कर्करोगाशी निगडीत बहुतांश शस्त्रक्रिया या आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेत मोफत होत आहेत. त्यामुळे रुग्णांनी आजार अंगावर न काढता रुग्णालयात भेट द्यावी किंवा जवळच्या एसएमबीटी क्लिनिकमध्ये संपर्क साधावा.

डॉ. संदीप इशी, मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट (कॅन्सर तज्ज्ञ), एसएमबीटी हॉस्पिटल

# संगम वधू-वर सूचक केंद्राचे पुनर्विवाहासाठी आवाहन

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
समाजात अनेक विधवा व एकाकी जीवन जगणाऱ्या महिला आहेत, ज्यांना पुनर्विवाहाची अपेक्षा आहे. अशा महिलांनी पुढे येत 'नव्या आयुष्याची सुरुवात करण्यासाठी संगमनेर येथील संगम वधू-वर सूचक केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



ग्रामीण भागात अनेक तरुण ४० ते ४५ वर्षांच्या वयात पोहोचूनही अविवाहित राहिल्याचे चित्र सध्या दिसत आहे. कुटुंब व्यवस्थेच्या दृष्टीने ही अत्यंत गंभीर बाब मानली जात असून, यावर उपाययोजना करण्यासाठी संगम वधू-वर सूचक केंद्र पुढे सरसावले आहे.

या पार्श्वभूमीवर केंद्राचे संचालक मांडे यांनी हे महत्त्वपूर्ण आवाहन केले आहे. पुनर्विवाह हा सामाजिकदृष्ट्या सकारात्मक बदल घडवणारा निर्णय असल्याचेही मांडे यांनी नमूद केले. तरी इच्छुक महिलांनी व संबंधितांनी केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अभिनेता दिग्दर्शक प्रमोद पंडीत यांचा "द फार्म हाऊस" लवकरच रिलीज

लोणी
(युवावार्ता प्रतिनिधी)-
पाथरे बुद्रुक, तालुका राहता, जिल्हा अहिल्यानगर, इथले राहणारे अभिनेता दिग्दर्शक प्रमोद पंडित यांनी दिव्यांगात्वावर मात करत आपली अभिनेता म्हणून एक नवी ओळख निर्माण केली. तसेच सध्या लोकप्रिय असलेले गाणे झटपट पटापट, या गाण्याची लोकप्रियता लहानापासून मोठ्यापर्यंत महाराष्ट्रभर क्रेझ वाढत आहे. तसेच, द फार्म हाऊस मराठी चित्रपट मध्ये वेटरचा भूमिकेत दिसणार आहे, तरी लवकरच प्रदर्शित होणार आहे.



त्यामध्ये काम केलेले व्ही मगदूम फिल्म प्रोडक्शन प्रस्तुत, द फार्म हाऊस मराठी चित्रपट. कलाकार, गणेश यादव, संतोष सुतार, रेखा माने, प्रमोद पंडित. कॅमेरामन प्रशांत बनसोडे, डायरेक्टर प्रदीप भोरे. प्रोडूसर विकास मगदूम व प्रकाश होळकर.

सदर चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार असून, स्थानिक कलाकारांना मिळालेली ही संधी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे. तसेच या चित्रपटाच्या माध्यमातून प्रमोद पंडित यांची अभिनय कारकीर्द आणखी बळकट होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# वनताराने जगातील पहिल्या वन्यजीव आणि पशुवैद्यक जागतिक विद्यापीठाची केली स्थापना

जामनगर
(वार्ताहर)-
रिलायन्स इंडस्ट्रीजचे कार्यकारी संचालक अनंत अंबानी यांनी स्थापन केलेल्या वनतारा या जागतिक वन्यजीव संरक्षक संघटनेने गुजरातच्या जामनगरमध्ये चुनतारा विद्यापीठ स्थापन केल्याची घोषणा केली आहे. वन्यजीव संरक्षण आणि पशुवैद्यक शास्त्र या क्षेत्राला वाहून घेतलेले हे जगातील पहिले एकात्मिक जागतिक विद्यापीठ असेल. पशु कल्याण क्षेत्रातील शास्त्रीय संशोधन वाढवणे तसेच वन्यजीव संरक्षणाचे भवितव्य या क्षेत्रांवर या विद्यापीठाचा भर असेल. पशुवैद्यक औषधे, वन्यजीव संरक्षण आणि वन्यजीवांचे जतन या क्षेत्रात पुढील तज्ञ निर्माण करणे, हे या विद्यापीठाचे ध्येय आहे. या विद्यापीठाचे अभ्यासक्रम भारताच्या परंपरागत ज्ञानाचा वापर करून, शिक्षणाचे विशिष्ट हेतूंवर आधारित आणि भविष्यकाळासाठी सज्ज असे मॉडल तयार करतील.




या विद्यापीठाची संकल्पना नालंदा विद्यापीठाच्या ज्ञानपरंपरेवर आधारित आहे. भूमिपूजन स्थळी उभारण्यात आलेले बिजोलिया पाषाण हे प्राचीन विध्यन संस्कृतीचे प्रतीक असून, भारताच्या समृद्ध शैक्षणिक वारशाची आठवण करून देतात. या समारंभात 'वनतारा यूनिव्हर्सिटी फाउंडिंग फेलोज' आणि 'एव्हरी लाइफ मॅटर्स' या शिष्यवृत्त्यांची घोषणाही करण्यात आली. ज्ञानाचा उपयोग केवळ प्रगतीसाठीच नव्हे, तर संरक्षणासाठीही करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

जल, माती आणि पाषाण यांची धार्मिक पद्धतीने स्थापना करून त्याद्वारे प्रतीकात्मक पायाभरणी करण्यात आली. हे सर्व भाग भारताच्या वेगवेगळ्या जैवविविधतेने असलेल्या समृद्ध ठिकाणांवरून, म्हणजेच गवताळ भाग, जंगल, पाणथळ क्षेत्र, हिमालय आणि अन्य पर्वतरांगा येथून आणले होते. देशाच्या उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम आणि मध्य भागातून आणलेले हे भाग भारताच्या समृद्ध पर्यावरणाचे आणि देशाच्या समृद्ध नैसर्गिक वारशाच्या पायावर आधारित, विद्यापीठ उभारण्याच्या दूरदृष्टीचे प्रतीक होते.

काय असेल या विद्यापीठात ?

या विद्यापीठात पदवीपूर्व, पदव्युत्तर अभ्यासक्रम, विशेष अभ्यासक्रम असतील. वन्यजीव औषधे व शस्त्रक्रिया, पोषण, त्यांची वर्तणूक शास्त्र, त्यांची अनुवंशिकता, साथीचे रोग, आरोग्य संरक्षणाचे धोरण तसेच नैसर्गिक पशुसंवर्धन पूरक वातावरण निर्मिती यांचा समावेश. वनताराच्या कामाशी सुसंगत अशी क्षमता असलेल्या विशेष महाविद्यालयांमध्ये, विद्यापीठातर्फे सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या निम्नस्तरातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देखील दिली जाईल. या विद्यापीठात अत्याधुनिक शैक्षणिक आणि वैद्यकीय पायाभूत सुविधा, वेगवेगळ्या प्रकारचे आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि निवासी संकुल असेल. संशोधनावर भर असेल.

प्रत्येक जीवाचे संरक्षण करणारी पिढी घडवायची-

वन्यजीवांच्या सेवेसाठी सहानुभूती, ज्ञान आणि कौशल्य यांचा संगम आवश्यक आहे. 'आ नो भद्रा क्रतवो यन्तु विश्वतः' या ऋग्वेदातील बोधवाक्यानुसार, जगभरातील श्रेष्ठ विचार स्वीकारून प्रत्येक जीवाचे संरक्षण करणारी नवी पिढी घडवणे हेच आमचे ध्येय आहे.

अनंत अंबानी, रिलायन्स इंडस्ट्रीजचे कार्यकारी संचालक.

# प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज सादर करावेत

अहिल्यानगर
(जिल्हा माहिती अधिकारी)-
राज्यातील युवक-युवतींना उद्योग क्षेत्रात रोजगारक्षम बनवण्यासाठी केंद्र शासनाने प्रधानमंत्री रोजगार व कौशल्य विकास पॅकेजअंतर्गत प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना सुरू केली आहे. या योजनेच्या माध्यमातून पुढील पाच वर्षांत एक कोटी तरुणांना इंटर्नशिपची संधी उपलब्ध करून देण्याचा केंद्र सरकारचा मानस आहे. विविध नामांकित कंपन्यांमध्ये इंटर्नशिपची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, इच्छुक उमेदवारांनी https://pminternship.mca.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करून आपल्या शैक्षणिक पात्रतेनुसार व कौशल्यांनुसार अर्ज सादर करावेत, असे आवाहन सहायक आयुक्त रविकुमार पंतम यांनी केले आहे.




योजनेअंतर्गत देशभरातील सुमारे २ हजार कंपन्यांसोबत करार करण्यात आले असून, सहभागी होणाऱ्या प्रत्येक इंटर्नला कामावर रुजू होताना एकरकमी ६ हजार रुपये, तसेच पुढील ९ महिन्यांसाठी प्रतिमहिना ५ हजार रुपये (केंद्र सरकारचे ४,५०० व कंपनीचे ५०० रुपये) असे वार्षिक अनुदान दिले जाणार आहे. यामुळे युवकांना प्रत्यक्ष औद्योगिक अनुभवासह आर्थिक साहाय्यही मिळणार आहे.

ही योजना विशेषतः शिक्षण पूर्ण केलेल्या किंवा सध्या रोजगारात नसलेल्या बेरोजगार युवक-युवतींसाठी उपयुक्त ठरणार आहे. यासाठी वयोमर्यादा २१ ते २४ वर्षे अशी निश्चित करण्यात आली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील युवकांसाठी या योजनेअंतर्गत सुमारे २१७ पदांची संधी उपलब्ध आहे. याबाबत अधिक माहितीसाठी https://pminternship.mca.gov.in या संकेतस्थळावर अथवा ०२४१-२९९५७३५ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# संपादकीय...

## तंत्रज्ञान सज्ज, पण मनुष्यबळ अजून तयार नाही

जनरेटिव्ह एआय म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा नवा अवतार आज जगभरात प्रचंड चर्चेत आहे. उद्योग, प्रशासन, शिक्षण आणि सर्जनशील क्षेत्र अशा सर्वच क्षेत्रांमध्ये या तंत्रज्ञानामुळे आमूलाग्र बदल घडतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जाते. कामकाजाची पद्धत बदलून टाकणारी, मानवी क्षमतांना बळ देणारी आणि उत्पादकता वाढवणारी ही क्रांती मानली जात असली, तरी प्रत्यक्षात अनेक संस्थांना अपेक्षित परिणाम मिळत नसल्याचे चित्र समोर येत आहे. मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक, प्रयोग आणि पायलट प्रकल्प राबवूनही ठोस परिणाम दिसत नाहीत, ही बाब विचार करण्यास भाग पाडणारी आहे. आज अनेक कंपन्या जनरेटिव्ह एआयचा वापर करून विविध प्रयोग करत आहेत. अहवाल तयार करणे, ग्राहकांशी संवाद साधणे, सामग्री निर्माण करणे किंवा डेटा विश्लेषण अशा विविध कामांसाठी ही साधने वापरली जात आहेत. मात्र या प्रयोगांचे रूपांतर सातत्यपूर्ण आणि उपयुक्त कामकाजात करण्यात अनेक संस्था अपयशी ठरत आहेत. यामागील मुख्य कारण म्हणजे 'लर्निंग गॅप' अर्थात शिकण्यातील अंतर. हे अंतर तांत्रिक कमतरतेमुळे नाही, तर संस्थात्मक आणि सांस्कृतिक मर्यादांमुळे निर्माण होते. एखाद्या संस्थेत एआयचा वापर कसा करायचा, कोणत्या प्रक्रियेत तो अधिक उपयुक्त ठरेल आणि त्याचा प्रत्यक्ष परिणाम कसा मोजायचा, याबाबत स्पष्टता नसल्यामुळे समस्या निर्माण होते. अनेक वेळा कर्मचारी एआय साधनांचा वापर करतात, पण त्याचा त्यांच्या कामावर नेमका कसा परिणाम होतो, याचे मोजमाप होत नाही. त्यामुळे प्रयोग सुरू राहतात, पण त्यातून शिकण्याची प्रक्रिया थांबते. परिणामी, एआयचा वापर हा केवळ एक ट्रेंड बनतो, ठोस परिणाम देणारी प्रणाली बनत नाही. या प्रक्रियेचा सर्वाधिक फटका कर्मचाऱ्यांना बसतो. सैद्धांतिकदृष्ट्या एआयमुळे काम सोपे होईल, पुनरावृत्तीची कामे कमी होतील आणि अधिक मूल्यवान कामासाठी वेळ मिळेल, अशी अपेक्षा असते. परंतु प्रत्यक्षात अनेकदा कर्मचाऱ्यांना एआयने तयार केलेल्या अपूर्ण किंवा चुकीच्या परिणामांमध्ये सुधारणा करावी लागते. त्यामुळे वेळ वाचण्याऐवजी अधिक वेळ खर्च होतो. काही ठिकाणी एआय साधने कामकाजाशी जुळवून घेण्यात अपयशी ठरतात, तर काही ठिकाणी सुरुवातीचे उत्साही प्रकल्प काही महिन्यांतच थांबतात. लर्निंग गॅपची समस्या केवळ प्रशिक्षणाच्या अभावामुळे नाही. अनेक संस्थांमध्ये प्रशिक्षण दिले जाते, पण ते प्रत्यक्ष कामाशी जोडलेले नसते. कर्मचारी एआय कसे कार्य करते हे शिकतात, पण ते त्यांच्या दैनंदिन कामात कसे वापरायचे, याचे मार्गदर्शन मिळत नाही. याशिवाय, चुका करण्याची भीती, प्रयोगशील वातावरणाचा अभाव आणि नेतृत्वाकडून स्पष्ट दिशा नसणे, या कारणांमुळेही एआयचा प्रभाव कमी होतो. संस्थात्मक रचनेतील अडथळेही या समस्येला कारणीभूत ठरतात. तांत्रिक विभाग आणि व्यवसायिक विभाग यांच्यातील दरी, अभिप्राय यंत्रणेचा अभाव आणि समन्वयाची कमतरता यामुळे एआयचा योग्य वापर होत नाही. एआय प्रणाली सतत सुधारण्यासाठी अभिप्राय आवश्यक असतो. पण जर वापरकर्त्यांकडून मिळणाऱ्या चुका, सुधारणा किंवा अनुभव यांचे विश्लेषण होत नसेल, तर प्रणाली स्थिर राहते आणि तिची उपयुक्तता कमी होते. ही दरी भरून काढण्यासाठी संस्थांनी तंत्रज्ञानापेक्षा कार्यपद्धती आणि संस्कृतीवर अधिक लक्ष दिले पाहिजे. एआयचा वापर हा केवळ तांत्रिक निर्णय नसून तो एक व्यापक संघटनात्मक बदल आहे. प्रत्येक प्रयोग हा एखाद्या प्रत्यक्ष समस्येशी जोडलेला असावा आणि त्याचे परिणाम मोजण्यासाठी स्पष्ट निकष असावेत. छोट्या प्रमाणावर केलेले यशस्वी प्रयोग मोठ्या प्रमाणावर विस्तारले, तरच एआयचा खरा फायदा मिळू शकतो. कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी प्रयोग करण्याची संधी देणे, चुका स्वीकारणे आणि त्यातून शिकण्याची संस्कृती निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. सतत बदलणाऱ्या या तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्यासाठी सातत्यपूर्ण शिक्षण आणि प्रशिक्षण गरजेचे आहे. नेतृत्वानेही स्पष्ट दृष्टी, संयम आणि दीर्घकालीन नियोजन यावर भर दिला पाहिजे. एकूणच, जनरेटिव्ह एआय हे तंत्रज्ञान प्रचंड क्षमता असलेले असले, तरी त्याचा खरा उपयोग संस्थांच्या शिकण्याच्या क्षमतेवर अवलंबून आहे. केवळ तंत्रज्ञान स्वीकारून बदल घडत नाही; त्या तंत्रज्ञानाचा योग्य वापर, सातत्यपूर्ण सुधारणा आणि सामूहिक शिकण्याची प्रक्रिया यामुळेच अपेक्षित परिणाम साध्य होऊ शकतात.

# झोळेकर परिवाराची आईच्या वाढदिवसानिमित्त टाकळी शाळेस पुस्तकांची अनोखी भेट




अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)- अकोले पंचायत समितीतील विशेष शिक्षक कैलास झोळेकर यांनी नुकताच आपल्या मातोश्री लिलाबाई भाऊसाहेब झोळेकर उर्फ पाटलीणबाई यांचा ८० वा वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला. या निमित्ताने त्यांनी शैक्षणिक व सामाजिक बांधिलकी जपत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टाकळी, उंचखडक खुर्द, औरंगपूर, अकोले मुले, नवलेवाडी या शाळांना वाचनीय पुस्तकांची भेट देवून एक आदर्श व स्तुत्य उपक्रम राबवला.

या दिमाखदार सोहळ्यास मुख्य अतिथी म्हणून आमदार डॉ. किरण लहामटे उपस्थित होते. याशिवाय महाराष्ट्र कृषक समाजाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मनकर, राष्ट्रसंत पूज्य ज्ञानेशानंद शास्त्री, अकोले तालुका पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी अरविंद कुमावत, राजेश पावसे, नगरसेविका प्रतिभा मनकर, भास्कर वाळुंज, संपतराव नाईकवाडी, लक्ष्मण शेणकर तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर व शिक्षक बहुसंख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी सुनितताई कातोरे यांच्या सुश्राव्य प्रवचनाचा आनंद घेतला. कार्यक्रमाचे औचित्य साधून संयोजकांनी कर्तृत्ववान मातोश्री लिलाबाई झोळेकर यांचा संघर्षमय जीवन प्रवास चित्रफितीतून उलगडून दाखवला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी. डी. वाकचौरे यांनी केले. टाकळी शाळेतील विद्यार्थ्यांना पुस्तकांची ज्ञानरूपी भेट दिल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक डॉ. श्रीनिवास पोतदार, सहशिक्षक संजय देशमुख, दत्तात्रय देवगिरे व संगिता धिंदळे यांनी झोळेकर परिवाराचे विशेष आभार मानले आहे.

# श्रीरामपुरात सोमवारी विराट हिंदू संमेलन

श्रीरामपूर (युवावार्ता प्रतिनिधी)- श्रीरामपूर येथील थत्ते मैदानावर सोमवार, दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून, या संमेलनास श्रीरामपूर शहर, तालुका व परिसरातील हिंदू बंधू-भगिनींनी उपस्थित राहावे, असे आवाहन संमेलनाध्यक्ष बाबासाहेब काळे पाटील यांनी केले आहे.

या संमेलनासाठी विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज, रामगिरीजी महाराज तसेच डॉ. जयंतीभाई भाडेसिया हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून हिंदू समाजाला संबोधित करणार आहेत. संमेलनापूर्वी शहरातून मिरवणूक काढण्यात येणार असून, त्यामध्येही नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आयोजकांनी नमूद केले आहे. हिंदू एकात्मता, सांस्कृतिक मूल्यांचे जतन व सामाजिक ऐक्य बळकट करण्याच्या उद्देशाने या विराट संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर, श्रीरामपूर परिसरातील नागरिकांनी एकजुटीने उपस्थित राहून संमेलन यशस्वी करावे, असे आवाहन संमेलन समितीच्या वतीने बाबासाहेब काळे यांनी केले आहे.


सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अहिल्यानगर विभाग अहिल्यानगर
२ रा मजला, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत
आकाशवाणी केंद्रा समोर, अहिल्यानगर
दिनांक : ०७/०४/२०२६

**चौकशीची जाहीर नोटीस**

**बदल अर्ज क्रमांक: ३३८/२०२६**

सार्वजनिक न्यासाचे नांव व पत्ता: श्री. गुरुदेव दत्त ट्रस्ट, मिळकत नं. ४७६, मु. पो. कऱ्हे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर न्यास नोंदणी क्रं. इ-१३९०/अहिल्यानगर

**बाबत**

**श्री. पंढरीनाथ गबाजी गुंजाळ,** रा. संगमनेर, जि. अहिल्यानगर..........अर्जदार

सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, धर्मादाय उप आयुक्त, अहिल्यानगर विभाग अहिल्यानगर हे वर नमुद केलेल्या चौकशी अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत :-

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत न्यासाचे मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत(वर्णन) - काही नाही.

ब) स्थावर मीळमत (वर्णन) -

१) मे. सहदुय्यम निबंधक वर्ग २, संगमनेर यांचे हद्दीतील मौजे कऱ्हे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील गट नं. ५०० मधील ०१ हे ५५ आर. क्षेत्र आकार ६२०.०० पैकी २० आर क्षेत्र आकार ८०.०० याची चतु:सीमा :-

पुर्वेस - राष्ट्रीय महामार्ग एन एच ५० पश्चिमेस गट न ५०० पै.
दक्षिणेस गट न ५०० पै, उत्तरला गट न ५०० पै.

बाजार मुल्य ९,२०,०००:००

२) वरील बिन शेती मिळकतीमध्ये खालील प्रमाणे मदिर बांधकाम
मिळकत नं. ५८१. श्री. गुरुदेव दत्त मंदिर देवस्थान, आर.सी.सी. पध्दतीचे बांधकाम.
लांबी ८९ फुट X रुदी ६३ फुट. एकुण ५६०७ चौ. फुट.

सदरच्या चौकशी प्रकरणी कोणास काही हरकत घ्यावयाची असल्यास, अगर पुरावा देणेचा असल्यास त्यांनी लेखी कैफीयत, ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखे पासुन तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल, अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफीयतीचा विचार केला जानार नाही. तसेच वरील मुदतीत कैफीयत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही, असे समजुन चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहिल्यानगर विभाग अहिल्यानगर यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०७/०४/२०२६ रोजी दिली.

(लिपीक) सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहिल्यानगर विभाग अहिल्यानगर
(अधिक्षक) सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अहिल्यानगर विभाग अहिल्यानगर

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME SHAIKH YUSUF SHAIKH MAKBUL
TO NEW NAME AS YUSUF MAKBUL SHAIKH
ADD - JORVE NAKA, LAKHMIPURA, SANGAMNER, TAL - SANGAMNER, DIST - AHMEDNAGAR, 422605

पाहिजेत
होतकरु/अनुभवी
सेल्समन व हेल्पर
संपर्क
कटारिया क्लॉथ सेंटर
पत्ता – मेन रोड, संगमनेर ४२२६०५
9595225428

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME PAMABAI LALJI UMBARKAR
TO NEW NAME AS KAVITA DATTATRAY GUNJAL
BY AFFIDAVIT NO- 397/2026
DATE 10/04/2026

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME SAZIYA SHAIKH YUNUS
TO NEW NAME AS SAJIYA FAHIM QURESHI
ADD -NEAR GAUSIYA MASJID, BISMILLAH, COLONY, MADINA NAGAR, TAL- SANGAMNER, DIST, AHMEDNAGAR, 422605

**सिद्धकला स्कूल ऑफ नर्सिंग, संगमनेर**
नेहरु चौक, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर, पिन – ४२२ ६०५, फोन नं. ९१७५६६४०७१
Walk In Interview (थेट मुलाखत) आकर्षक पगार

| अ. क्र. | पद | जागा | पात्रता |
|---|---|---|---|
| १ | क्लर्क / कॉम्प्युटर ऑपरेटर | २ | B.A. / B.Com. / B.Sc. मराठी व इंग्रजी टायपिंग आवश्यक अनुभवास प्राधान्य |
| २ | शिपाई | ६ | अनुभवास प्राधान्य |

तरी इच्छुकांनी सोमवार दि. १३/०४/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. आवश्यक त्या कागदपत्रांसह स्वखर्चाने उपस्थित रहावे. निवड झालेल्या उमेदवाराने त्वरित रुजू व्हायचे आहे.
प्राचार्य, सिद्धकला स्कूल ऑफ नर्सिंग, संगमनेर

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता
पाहिजेत
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक, अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाटचाल तीन दशकांची

CorelDRAW Ps Ai Id
WE ARE HIRING JOIN OUR TEAM
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005






卐 अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर 卐
MALPANI
मालपाणी उद्योग समूह आयोजित
भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण – मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)

जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

श्री साई मेस
आमच्याकडे शुद्ध शाकाहारी घरगुती मेस आहे
शुद्ध शाकाहारी जेवण तयार करुन मिळेल संगमनेर
8530530656

पाहिजेत
पेट्रोल पंपावर कामासाठी मुले पाहिजेत
पत्ता – तीन बत्ती चौक, दिल्ली नाका, संगमनेर
9860989807
9422225947

पाहिजेत
मेडिकल दुकानासाठी महिला पाहिजे
कॉम्प्युटर ऑपरेटर - २
हेल्पर - २
प्रभात मेडिकल, नवीन नगर रोड, ताजने मळा, संगमनेर
9921245753

पाहिजेत
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुनी संपर्क साधावा
मार्केटिंग – १ जागा
दुकानकामासाठी – ०२
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फायनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर
8669184141

पाहिजेत
अकाउंटंट - ०२ जागा
टॅली कोर्स
ड्रायव्हर - ३ जागा
कॉम्प्युटर ऑपरेटर
संपर्क - डॉ. इथापे हॉस्पिटल, नवीन नगर रोड संगमनेर
9370071777
9822791484

पाहिजेत
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेत
वेल्डर
हेल्पर
7030125701

पाहिजेत
शिलाई मशीन कामासाठी महिला - ०२
सेल्स एक्झिक्युटिव्ह - ०१
अमोल होम डेकोर मालदाड रोड, संगमनेर
8788483245
8698001007

पाहिजेत
श्रद्धा क्लिनिक आणि पंचकर्म सेंटर
रिसेप्शनिस्ट – १ (महिला)
वेळ – सकाळी ९ ते ५
ताजणे मळा, प्रभात मेडिकल समोर, संगमनेर
7498749500

भाड्याने देणे आहे
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो-हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

खुशखबर... आपल्या मुला मुलींचे लग्न आमच्या प्रशस्त मंगल कार्यालयात करा
साई मंगल लॉन्स
थोड्याच तारखा शिल्लक
पत्ता– समनापुर, एच पी पेट्रोल पंप शेजारी
संपर्क– प्रताप गोडगे
9890924380

वॉचमन पाहिजे
बांधकाम साईट वर वॉचमन भरणे आहे
राहण्याची सोय आहे
संपर्क – नविन नगर रोड, संगमनेर
8378956909
8459199913

पाहिजेत
संगमनेर शहरात ऑफिस कामाकरिता पदवीधर मुलगा पाहिजे
आकर्षक पगार
9881855547

पाहिजेत
मार्केटिंगसाठी मुलगा पाहिजे – ०२ जागा (गाडी व लायसन्स पाहिजे)
दुकानकामासाठी डिलीव्हरी बॉय पाहिजे – ०२ जागा
9766921306

पाहिजेत
अकाउंटंट - ०१ जागा (बी.कॉम/ एम.कॉम) टॅली प्राईम
मायक्रोबायोलॉजी - ०१
हेल्पर (मुले/मुली)- ०३
२ ते ३ वर्ष अनुभव
रास्पबेरी अॅग्रो बिझनेस प्रा.लि., गोडगे इंडस्ट्रीअल इस्टेट, संगमनेर एम.आय.डी.सी च्या बाजूला, वेल्हाळे रोड
9860284257
raspberryagrosales@gmail.com

पाहिजेत
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

पाहिजेत
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक ९३२५०२८६८६

दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर, ०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४
वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या, व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# संगमनेरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महामानव, प्रज्ञासूर्य, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त संगमनेर शहरात विविध सामाजिक, सांस्कृतिक व गौरव कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. दोन दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमांमुळे शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**१४ एप्रिल रोजी अभिवादन सभा व पुरस्कार वितरण-** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान, संगमनेर यांच्या वतीने मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ वाजता अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. त्यानंतर बुद्धवंदना, अभिवादन सभा आणि पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे.

या प्रसंगी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भास्करराव बागुल यांना जीवन गौरव पुरस्कार तर अनिकेत घुले (अध्यक्ष, छत्रभारती, महाराष्ट्र राज्य) यांना प्रेरणा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. कार्यक्रमात प्रा. व्ही. बी. अहिरे (संगमनेर महाविद्यालय) हे व्याख्यान देणार आहेत. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री बाळासाहेब थोरात, आ. सत्यजीत तांबे, डॉ. सुधीर तांबे, नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

**१३ एप्रिल रोजी सांस्कृतिक कार्यक्रम व गुणवंतांचा गौरव -**



भारतीय बौद्ध महासभा व वंचित बहुजन आघाडी, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि. १३ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कालकथित चंद्रकांत लहुजी पवार यांच्या स्मरणार्थ गुणवंत विद्यार्थी, युवा उद्योजक व सेवानिवृत्त पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

रात्री ९ वाजता 'स्वरसंगम कला मंच, मुंबई' यांच्या वतीने भीमगीतांचा कार्यक्रम सादर होणार असून कवी गौतम साळवे व गायक समाधान वाघमारे हे आपली कला सादर करणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उत्कर्षाताई रुपवते राहणार असून विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

दोन्ही दिवसांचे कार्यक्रम संगमनेर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात पार पडणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या जयंती महोत्सवानिमित्त संगमनेरमध्ये सामाजिक एकात्मता, प्रेरणा आणि विचारांचे जागरण घडवून आणण्याचा प्रयत्न होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# कॉर्पोरेट जिहाद प्रकरणावरून राजकारण तापले

## वडेट्टीवारांची सरकारवर टीका

नाशिक (प्रतिनिधी)-

नाशिकमधील आयटी कंपनीत समोर आलेले 'कॉर्पोरेट जिहाद' प्रकरण आणि भोंदू बाबा अशोक खरात याच्यावरील कारवाईवरून सध्या राजकारण चांगलेच तापले आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सत्ताधारी आणि प्रशासकीय यंत्रणेवर सडकून टीका केली आहे. अशोक खरातच्या जागी जर एखादा मुस्लिम असता, तर आतापर्यंत अख्या मुसलमानांची वरात काढली असती, असे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. विजय वडेट्टीवार पुढे बोलताना म्हणाले की, कोणत्याही गुन्ह्याकडे पाहताना त्याचा धर्म किंवा जात पाहणे चुकीचे आहे. अशोक खरातने जे काही केले, ते अत्यंत चुकीचे आहे. नालायक माणसाला नालायक म्हणायची हिंमत सर्वांमध्ये असली पाहिजे, मग तो कोणत्याही जातीचा का असेना.



विजय वडेट्टीवार म्हणाले की, राज्यातील महायुती सरकारने घोषित केलेली कर्जमाफी ही शेतकऱ्यांची फसवणूक असून, ती केवळ एक 'बनवाबनवी' आहे. जोपर्यंत शेतकऱ्यांचा ७/१२ पूर्णपणे कोरा होत नाही, तोपर्यंत त्यांना खऱ्या अर्थाने दिलासा मिळणार नाही. सरकारने केवळ आकड्यांचा खेळ न मांडता, प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर द्यावा. विमा योजनेच्या माध्यमातून केवळ विमा कंपन्यांचे भले होत आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे हवालदिल झालेला शेतकरी आजही मदतीपासून वंचित आहे. शेतकऱ्यांच्या नावाखाली कंपन्यांचे खिसे भरले जात आहेत.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, मतदारसंघातील कामांसाठी उबाठाचे खासदार सत्ताधाऱ्यांकडे जाऊ शकतात. सत्ता त्यांच्याकडे असल्याने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याकडे आम्ही सुद्धा जात असतो. मतदारसंघातील कामे असतात, त्यासाठी जाण्यात गैर काय? उद्धव ठाकरे वेळ देत नाही, हा केवळ आरोप आहे. आम्ही ज्या ज्या वेळी त्यांची वेळ मागितली, त्यांनी आम्हाला भेटीसाठी वेळ दिली आहे. कोणाचे जेवण चांगले वाटले म्हणून खासदार एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेकडे गेले असतील. यावर जास्त काही बोलणं योग्य नाही. पक्ष फुटण्याची काही चिन्ह, आता तरी काही दिसत नाही.

# देशभरात स्मार्ट प्रीपेड मीटर वापर बंधनकारक 1 एप्रिलपासून अंमलबजावणी सुरू

मुंबई (वृत्तसंस्था)

देशातील वीज वितरण प्रणालीत पारदर्शकता आणण्यासाठी केंद्र सरकारने केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने 'मीटरिंग नियमावली २०२६' लागू केली. त्यानुसार १ एप्रिल २०२६ पासून देशभरात प्रत्येक घरात 'स्मार्ट प्री-पेड मीटर' बसवणे बंधनकारक केले आहे. यामुळे सर्वसामान्यांना आता मोबाइलप्रमाणे आपले वीज मीटर रिचार्ज करावे लागणार आहे.



केंद्रीय विद्युत प्राधिकरणाचे सचिव राकेश कुमार यांनी काढलेल्या अधिसूचनेनुसार, मोबाईल किंवा इंटरनेटचे नेटवर्क उपलब्ध असलेल्या सर्व ठिकाणी जुने मीटर बदलून स्मार्ट मीटर लावले जातील. महाराष्ट्रात टप्प्याटप्प्याने स्मार्ट मीटर बसवण्यास सुरुवात झाली आहे. सर्व मीटर बदलल्यानंतरच 'प्री-पेड'ची प्रत्यक्ष अंमलबजावणी होईल. ग्राहकांवर बोजा पडू नये म्हणून याची कालबद्धता ठरविण्याचे अधिकार राज्य शासनाला देण्यात आले आहेत. 'रिमोट रीडिंग' तंत्रज्ञानामुळे मीटर रीडिंग घेणाऱ्या कर्मचाऱ्याची गरज उरणार नाही. मानवी चुकांमुळे येणाऱ्या अवाजवी आणि चुकीच्या बिलांचा फटका ग्राहकांना बसणार नाही. तसेच, बंद घरांची बिले भरण्याची कटकट संपेल.

६५० व्होल्टपेक्षा अधिक दाबाचा वीज पुरवठा घेणाऱ्या उद्योगांसाठी 'मेन मीटर', 'चेक मीटर' आणि 'स्टँडबाय मीटर' कुठे बसवावेत, याची स्पष्ट नियमावली जाहीर करण्यात आली आहे. यामुळे मीटरिंग अचूक होऊन वाद टळतील. वीज वापराचा अचूक डेटा मिळेल आणि वीजचोरीला १०० टक्के आळा बसेल, असा सरकारचा दावा आहे.

# शेतजमीन वाटणीला गती : २०० रुपयांत पोटहिस्सा मोजणी

मुंबई (प्रतिनिधी) : शेतजमिनींच्या वाटणीवरून निर्माण होणारे कौटुंबिक वाद मिटवण्यासाठी आणि सातबारा उतारा अद्ययावत करण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आता नाममात्र शुल्कात जमिनीचे तुकडे अधिकृतरीत्या मोजले जाणार असून, यामुळे पिढ्यानपिढ्या चालत आलेले भाऊबंदकीचे तंटे कमी होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

एकत्र कुटुंबाच्या नावावर असलेल्या एकाच सर्व्हे नंबर किंवा गटातील जमिनीचे अंतर्गत वाटप झाल्यानंतर प्रत्येक सहधारकाच्या वाट्याला आलेली जमीन स्वतंत्रपणे नकाशावर दाखवण्याची प्रक्रिया म्हणजे पोटहिस्सा मोजणी होय. या प्रक्रियेमुळे मूळ गटाचे उपविभाग होऊन प्रत्येकाला स्वतःचा स्वतंत्र हिस्सा अधिकृतपणे मिळतो. यापूर्वी जमिनीच्या मोजणीसाठी हजारो रुपये खर्च करावे लागत होते. मात्र, आता विभाजनासाठी प्रतिपोटहिस्सा केवळ २०० रुपये मोजणी शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

मोजणी पूर्ण झाल्यानंतर मिळणारी 'क' प्रत म्हणजे अधिकृत नकाशा हा जमिनीचा महत्त्वाचा पुरावा मानला जातो. नव्या निर्णयानुसार, ही प्रत शेतकऱ्यांना ठरावीक कालावधीत उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्यामुळे विविध शासकीय कामांसाठी शेतकऱ्यांना वारंवार कार्यालयीन फेऱ्या माराव्या लागणार नाहीत.



ग्रामीण भागात जमिनीच्या हद्दी निश्चित नसल्यामुळे बांधावरून होणारे वाद सर्वाधिक आढळतात. कोणाची जमीन किती आणि हद्द कुठपर्यंत याबाबत स्पष्टता नसल्याने अनेकदा तणाव निर्माण होतो. अधिकृत पोटहिस्सा मोजणीमुळे अशा वादांना आळा बसण्याची शक्यता आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी सातबारा उताऱ्यावर नोंद असलेल्या सर्व सहधारकांची संमती आवश्यक आहे. सर्व खातेदार परस्पर सहमतीने वाटणीस तयार असल्यासच सवलतीच्या दरात मोजणी प्रक्रिया पूर्ण केली जाईल. अन्यथा, वाद दिवाणी न्यायालयात जाऊ शकतो. अनेक कुटुंबांमध्ये जमिनीची तोंडी वाटणी झालेली असते, मात्र त्याची महसूल दप्तरी नोंद नसल्याने पुढे कायदेशीर अडचणी निर्माण होतात.

प्रक्रियेसाठी सहधारकांच्या सह्यांसह तहसीलदार किंवा भूमिअभिलेख कार्यालयाकडे अर्ज करावा लागणार आहे. त्यासोबत चालू सातबारा, ८-अ उतारा तसेच नोंदणीकृत वाटणीपत्र (असल्यास) जोडणे आवश्यक आहे. त्यानंतर प्रतिपोटहिस्सा २०० रुपये प्रमाणे चलन भरून भूकरमापक प्रत्यक्ष बांधावर येऊन मोजणी करतील. मोजणी पूर्ण झाल्यानंतर सातबारा उताऱ्यावर स्वतंत्र पोटहिस्सा नोंदवला जाईल.

# मुख्यमंत्र्याच्या पुढाकाराने एम्स नागपूरसोबत आरोग्य करार

अहिल्यानगर-
(जिल्हा महिती कार्यालय)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष पुढाकाराने राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या दिशेने राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने बालकांमधील असंसर्गजन्य आजारांवर (एनसीडी) प्रभावी नियंत्रणासाठी नागपूर येथील एम्स, बालरोग विभागासोबतमहत्त्वपूर्ण सामंजस्य करार (एमओयू) केला आहे.



कराराच्या माध्यमातून बालकांसाठी अधिक सुरक्षित, निरोगी आणि समर्थ वातावरण निर्माण करण्याच्या दिशेने ठोस पाऊल या सामंजस्य कराराबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, बालकांचे आरोग्य हे राज्याच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. असंसर्गजन्य आजारांवर प्रभावी नियंत्रण मिळविणे ही केवळ आरोग्य क्षेत्राची जबाबदारी नसून समाजाची एकत्रित बांधिलकी आहे. या कराराच्या माध्यमातून आपण मुलांसाठी अधिक सुरक्षित, निरोगी आणि समर्थ वातावरण निर्माण करण्याच्या दिशेने एक ठोस पाऊल टाकत आहोत.

हा करार नागपूर येथील एम्स, बालरोग विभागासोबत करण्यात आला असून, या अंतर्गत राज्यातील जिल्हा रुग्णालयांमध्ये चाइल्डहुड एनसीडी क्लिनिक्स स्थापन व कार्यान्वित करण्यात येणार आहेत. या उपक्रमातून टाईप-१ मधुमेह, जन्मजात हृदयरोग, दमा, स्थूलता, सिकलसेल, मानसिक आरोग्य आणि विकासात्मक विकार यांसारख्या आजारांचे प्रतिबंध, लवकर निदान आणि प्रभावी उपचार सुनिश्चित करण्यात येणार आहेत. तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, मानकीकृत उपचार पद्धती, डेटा संकलन प्रणाली आणि तज्ज्ञ मार्गदर्शन यावर विशेष भर दिला जाणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुढाकारातून करण्यात आलेले हा सामंजस्य करार पुढील तीन वर्षांसाठी कार्यान्वित असणार आहे. या करारांमुळे राज्यातील आरोग्य व्यवस्थेत गुणवत्ता, उपलब्धता आणि सर्वसमावेशकता वाढवण्यास मोठी चालना मिळणार आहे.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियान संचालक डॉ. कादंबरी बलकवडे, उपसचिव विलास बेंद्रे तसेच डॉ प्रशांत जोशी, एम्स नागपूरचे कार्यकारी संचालक, डॉ मीनाक्षी गिरीश, बालरोग तज्ज्ञ यावेळी उपस्थित होते. एम्स, नागपूर संस्थेचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत हा करार करण्यात आला.

# वारकरी संप्रदायात प्रतिगामी लोकांची घुसखोरी

## साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर पवारांची स्पष्ट भूमिका

मुंबई (वृत्तसंस्था)


शरद पवार यांनी वारकरी संप्रदायाबाबत महत्त्वपूर्ण आणि चर्चेत येईल असे विधान केले आहे. महिला शासकीय अधिकाऱ्यांच्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या निमित्ताने प्रकाशित करण्यात आलेल्या स्मरणिकेत त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. वारकरी संप्रदायात प्रतिगामी विचारसरणीच्या लोकांची घुसखोरी होत असल्याचा आरोप त्यांनी केला असून, या प्रवृत्तीमुळे चळवळीचा मूळ प्रबोधनात्मक हेतू धोक्यात येत असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली.



अखिल भारतीय साहित्य संमेलन या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर दिलेल्या लेखात पवार यांनी वारकरी परंपरेतील बदलत्या प्रवाहांवर भाष्य केले. त्यांच्या मते, या संप्रदायातील सुमारे ६० टक्के लोकांची मांडणी धर्मांध शक्तींना बळ देणारी होत आहे. समतेचा आणि प्रबोधनाचा संदेश देणाऱ्या वारकरी चळवळीमध्ये अशा विचारांची वाढ होणे ही चिंताजनक बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, या पार्श्वभूमीवर काही पुरोगामी विचार मांडणाऱ्या व्यक्तींची नोंद घेण्याचे काम सुरू केले आहे. सध्या सुमारे चाळीस जण असे दिसून येतात की जे कीर्तन आणि प्रवचनाच्या माध्यमातून प्रगत विचार मांडत आहेत. अशा लोकांची संख्या वाढणे आवश्यक असून, समाजप्रबोधनासाठी त्यांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

याचवेळी पवार यांनी वारकरी चळवळीत महिलांचा अभाव असल्याची खंतही व्यक्त केली. प्रबोधनाच्या या प्रवाहात महिलांचा सहभाग फारसा दिसत नाही, ही बाब त्यांनी दुर्दैवी असल्याचे म्हटले. समाजातील सर्व घटकांचा समतोल सहभाग असणे आवश्यक असल्याचे त्यांनी सूचित केले.

दरम्यान, या संमेलनाचे उद्घाटन देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असून, देशभरातील महिला शासकीय अधिकारी या कार्यक्रमात सहभागी होत आहेत. या निमित्ताने सामाजिक, सांस्कृतिक आणि धोरणात्मक मुद्द्यांवर चर्चा होत असून, त्यात वारकरी संप्रदायावरील पवार यांच्या विधानामुळे नवा वाद निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# पॅनल देणे आहे



दैनिक **युवावार्ता**
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता



# पॅनल देणे आहे





नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319

सेल्समन .................... 05
सेल्सगर्ल.................... 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर......................... 03

We are HIRING!
भंडारी
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर


# महात्मा फुले जयंतीनिमित्त मान्यवरांकडून विनम्र अभिवादन


छाया– प्रसाद सुतार, संगमनेर

युवावार्ता (प्रतिनिधी):

संगमनेर - क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी संगमनेर शहरातील माळीवाडा येथील पुतळ्यास विविध मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. स्त्रियांना आज समाजात जो मान सन्मान मिळत आहे, आज त्या ज्या उच्च पदावर कार्यरत आहेत त्यासाठी फुले दांपत्यांनी प्रचंड संघर्ष आणि त्याग केला आहे. स्त्री शिक्षणाचा पाया रचणाऱ्या आणि जाती अनंताच्या लढाईचे शिल्पकार ठरलेल्या महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे स्मरण करणे आणि त्यांच्या विचारांवर वाटचाल करून हा समाज शिक्षित, सुशिक्षित करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल असा विश्वास यावेळी अनेक मान्यवरांनी व्यक्त केला. महात्मा फुले यांच्या पुतळयास अभिवादन करण्यासाठी नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे, सौ. नीलम खताळ, माजी नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे, याच्यासह अनेक नेते, पदाधिकारी, स्थानिक प्रशासन अधिकारी, राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांच्या वतीने महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्याचे स्मरण करण्यात आले. तसेच शहरातील मुख्य शासकीय कार्यालयांमध्ये सकाळी अभिवादन सभेचे आयोजन करण्यात येऊन महात्मा फुले यांच्या कार्याचे स्मरण करण्यात आले.

# तळेगाव दिघे-आजमपूरचे पोलीस पाटील कांदळकर निलंबित

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील तळेगाव दिघे (आजमपूर) येथील पोलीस पाटील अनिल रावजी कांदळकर यांच्याविरोधात शासकीय कामकाजामध्ये हलगर्जीपणा केल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर प्रशासनाने गंभीर दखल घेत चौकशी केली. या चौकशीमध्ये अनिल कांदळकर हे दोषी आढळल्याने त्यांना संगमनेर उपविभागाचे उपविभागीय अधिकारी अरुण उंडे यांनी निलंबित केले आहे.

कांदळकर हे पोलीस पाटील म्हणून आपली जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडत नसल्याच्या तक्रारी वारंवार प्रशासनाकडे दाखल होत होत्या. या तक्रारींची दखल घेत संगमनेर उपविभागाचे उपविभागीय अधिकारी अरुण उंडे यांनी तात्काळ कारवाई करत संबंधित

संगमनेर प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश तहसीलदार तसेच संगमनेर तालुका पोलीस निरीक्षक यांना दिले होते. त्यांनी कांदळकर यांच्याबाबत सखोल चौकशी केली. चौकशीत कांदळकर यांच्या कामकाजातील त्रुटी आणि निष्काळजीपणा स्पष्टपणे समोर आला. शासकीय कर्तव्य पार पाडण्यात झालेल्या या गंभीर त्रुटीमुळे प्रशासनाने कठोर चौकशी अहवालाच्या आधारे उपविभागीय अधिकारी अरुण उंडे यांनी कांदळकर यांना तत्काळ प्रभावाने निलंबित करण्याचे आदेश जारी केले आहेत. या कारवाईमुळे तालुक्यातील प्रशासनिक यंत्रणेत खळबळ उडाली असून, कर्तव्यामध्ये कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई होणार असल्याचा स्पष्ट संदेश प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

# सांस्कृतिक महोत्सव भीम जयंती समितीच्या अध्यक्षपदी घारे, उपाध्यक्षपदी खरे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ब्लू पँथर ग्रुप संगमनेरचे संस्थापक अध्यक्ष आकाश उर्फ पप्पू भाऊ गोडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक महोत्सव युवा समितीच्या अध्यक्षपदी किरण घारे यांची तर उपाध्यक्षपदी संध्याताई खरे यांची निवड करण्यात आली.


आकाश गोडगे


किरण घारे


संध्याताई खरे

युवा कार्यकर्ते आकाश गोडगे संगमनेरात सामाजिक कार्यात सदैव आघाडीवर असणारे नेतृत्व आहे. अन्याय अत्याचार विरोधात रस्त्यावर लढणारे भीम योध्दा म्हणून देखील त्यांची ओळख आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली या नवीन शिलेदारांची निवड करण्यात आली.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी १४ एप्रिल रोजी घारे व खरे यांच्या नेतृत्वाखाली विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या जयंती उत्साहासाठी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे. तर या निवडीबद्दल दोन्ही मान्यवरांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# काँग्रेस कार्यकारणीच्या बैठकीसाठी मा. मंत्री बाळासाहेब थोरात दिल्लीत

युवावार्ता (प्रतिनिधी)



देशात होत असलेल्या पाच राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर देशातील महत्त्वाच्या काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीच्या बैठकीसाठी महाराष्ट्रातील वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात हे दिल्लीत उपस्थित आहेत.

नवी दिल्ली येथील इंदिरा गांधी भवन येथे काँग्रेस कार्य समितीची बैठक पार पडली यावेळी देशभरातील महत्त्वाचे २१ नेते उपस्थित होते पक्षाध्यक्ष खासदार मल्लिकार्जुन खर्गे, विरोधी पक्ष नेते खासदार राहुल गांधी, खासदार प्रियंका गांधी, के. सी. वेणुगोपाल, महाराष्ट्राचे मा. प्रांताध्यक्ष बाळासाहेब थोरात, यांच्यासह विविध महत्त्वाचे नेते बैठकीसाठी उपस्थित होते. काँग्रेस राष्ट्रीय वर्किंग कमिटी ही देशातील अत्यंत महत्त्वाची असून यामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी यांच्यासह अनेक मान्यवरांचा सहभाग राहिला आहे. देशाची धोरणात्मक राजनीति ठरवण्याबरोबर समता, बंधुता आणि राष्ट्रीय एकात्मता वाढीसाठी सीडब्ल्यूसीचे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. अमेरिका इराण युद्धामध्ये देशाची फसलेली परदेश नीती, वाढलेली महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, याचबरोबरमध्ये जातीय तणाव, धार्मिक ध्रुवीकरण, पाच राज्यांमध्ये होत असलेल्या विधानसभा निवडणुका आणि विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाल्या.


INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे

JOB VACANCY

| | |
|---|---|
| मार्केटिंग | १० जागा |
| टेली कॉलिंग | १० जागा |
| सेल्स ऑफिसर | ०५ जागा |
| ड्रायव्हर | ०२ जागा |


अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल

- पत्ता-
श्री स्वामी समर्थ एजन्सी,
स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर

- संपर्क -
7030334486
7030334494




सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी


आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ | * कर्ज व्याजदर कमी | * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता


## युवा न्यूज डिजिटल वाचक प्रतिसाद

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

युवा न्यूज डिजिटल क्षेत्रात कार्यरत असताना अनेक व्हिडिओंना एक लाखाच्या पुढून व्हूज मिळालेले आहेत. अत्यंत गंभीर घटनांच्या संदर्भातील व्हिडिओंना वाचकांचा उत्कृष्ट प्रतिसाद मिळत असताना दैनिक युवावार्ताद्वारे डिजिटल युवा प्रतिसाद माहिती वाचकांना देत आहोत. वाचकांनी आपले अभिप्राय कळविण्याची विनंती.

शैक्षणिक क्षेत्रात समर्पित भावनेने काम करणारे श्री.मधुकर कारभारी गुंजाळ सर सेवानिवृत्त होत असून त्यानिमित्त त्यांच्या कार्याची ओळख करून देण्यासाठी तयार केलेले चित्रफित दर्शकांना निश्चित आवडेल. त्यासंदर्भातील व्हिडिओ वाचकांच्या माहितीसाठी युवा न्यूज द्वारे QR कोड देत आहोत.


# चैतन्य हॉस्पिटल


- अतिदक्षता विभाग
- मधुमेह व हृदयरोग
- दमा व श्वसनाचे विकार
- फुफ्फुसासंबंधी औषधोपचार
- जनरल सर्जरी
- पोटाचे विकार व शस्त्रक्रिया
- किडनी विकार
- मेंदू विकार व शस्त्रक्रिया
- सर्पदंश व विषबाधा
- बालरोग चिकित्सा विभाग
- प्लास्टिक सर्जरी व व्यंगोपचार
- संधीवात व मणके विकार

आपत्कालीन औषधे व उपचार
सर्व कंपनीजच्या कॅशलेस सुविधा उपलब्ध

डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२



अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य



जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन



डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13








स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
# कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर

डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine

- सर्जरी विभाग
- अतिदक्षता विभाग
- अपघात विभाग
- डायलिसीस विभाग
- सुपर स्पेशालिटी विभाग
- न्यूरोविभाग
- हृदयरोग विभाग
- मेडिसीन विभाग
- अद्ययावत कॅथलॅब
- जॉईंट रिप्लेसमेंट
- स्पाईन सर्जरी
- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर

सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225

४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६



दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25